# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

दुरध्वनी क्रमांक- ०२१६२-२३३९२३ फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०२३२

वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


प्रेसनोट

दिनांक २३/११/२०२२.

**(वाई पोलीस ठाणे जि.सातारा यांची कारवाई)**

**( वाई शहरात तीन घरफोडया करणारा आरोपी ६ तासात अटकेत व २,३०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत.)**

दिनांक २२/११/२०२२ रोजी रात्री ००.४५ ते दिनांक २३/११/२०२२ रोजी ०६.०० वाजण्याच्या वाई शहरात डॉ.घोटावडेकर यांचे घोटावडेकर हॉस्पीटल,मधलीआळी,वाई येथे तसेच शैलेंद्र देवकुळे यांचे प्रसाद कन्स्ट्रक्शन,धर्मपुरी वाई येथील बंद फलॅटचे कुलूप तोडून कोणीतरी आज्ञात चोरटयाने घोटावडेकर हॉस्पीटल मधील कॉम्प्यूटर व इतर साहीत्य तसेच प्रसाद कन्स्ट्रक्शन येथील फलॅट मधील ३०,०००/- रुपयांचे ब्रेकर मशिन चोरीस गेले बाबतची तक्रार पोलीस स्टेशनला प्राप्त झाली. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा व श्री.बापू बांगर,अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती शितल जानवे-खराडे,उप विभागीय पोलीस अधिकारी वाई विभाग यांनी श्री.बाळासाहेब भरणे,पोलीस निरीक्षक वाई पोलीस स्टेशन यांना सदर अज्ञात आरोपीचा शोध घेवून पकडने बाबत आदेश दिलेले होते.

त्यानूसार श्री.बाळासाहेब भरणे,पोलीस निरीक्षक वाई पोलीस स्टेशन व गुन्हे प्रकटीकरण विभागाचे कर्मचारी हे घटना घडले पासुन वाई शहरात पेट्रोलिंग करुन व बातमीदारांचे भेटी घेवून आरोपींचा शोध घेत होते, परंतू आरोपींची माहीती मिळत नव्हती.दरम्यान श्री.बाळासाहेब भरणे,पोलीस निरीक्षक वाई पो.स्टे. यांना सदरचा प्रकार केलेल्या एका आरोपी माहीती मिळाली त्यांनी तात्काळ गुन्हे प्रकटीकरण विभागाचे कर्मचा-यांनी सदर इसमाचा शोध घेणे बाबत मार्गदर्शन व सुचना दिल्या त्यानूसार गुन्हे प्रकटीकरण विभागाचे कर्मचारी वाई शहरात सदर आरोपीचा शोध घेत असताना शिंदे हायस्कुल समोरुन संशयीत आरोपी हा मोटार सायकलवरुन जात असताना दिसला त्यास आमची चाहूल लागताच तो पळून जात असताना त्यास पाठलाग करुन पकडले आहे.त्यानंतर त्याचे सोनजाईनगर,वाई यथील राहते घराची झडती घेतली असता त्याने डॉ.घोटावडेकर यांच्या हॉस्पीटल मधून चोरलेले सुमारे २,००,०००/- रु चे मशिन व रोख रक्कम तसेच धर्मपुरी,वाई येथिल प्रसाद कन्स्ट्रक्शन येथील फलॅट मधिल चोरलेले ३०,०००/- रु.किमतीचे दोन ब्रेकर मशिन हस्तगत असा एकुण २,३०,०००/-रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.पकडलेल्या आरोपीनेही सदरच्या चो-या केल्याचे कबूल केलेले आहे.

सदरची कारवाई श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक, सातारा व श्री.बापू बांगर अपर पोलीस अधीक्षक सातारा,श्रीमती शितल जानवे-खराडे,उप विभागीय पोलीस अधिकारी वाई विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.बाळासाहेब भरणे,पोलीस निरीक्षक वाई पोलीस स्टेशन व गुन्हे प्रकटीकरण विभागाचे कर्मचारी पो.हवा.विजय शिर्के,सोनाली माने,पो.कॉ.किरण निंबाळकर,श्रावण राठोड,प्रसाद दुदुस्कर,अमित गोळे यांनी सदरची कारवाई केलेली असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे श्री.समीर शेख पोलीस अधीक्षक, सातारा व श्री.बापू बांगर अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती शितल जानवे-खराडे,उप विभागीय पोलीस अधिकारी वाई विभाग यांनी अभिनंदन केले आहे.

---

पोलीस अधीक्षक सातारा, करीता

